# कृषी पुरक उद्योग क्षेत्रातील उल्लेखनिय कार्य (बटेरपालन)

## नामांकन प्रस्ताव



| | | |
|---|---|---|
| शेतकऱ्याचे नांव | :- | श्री.क्रिष्णा रामलु पेंडपवार, |
| गाव/तालुका/जिल्हा | :- | सोनखास, घाटंजी, यवतमाळ |
| संपुर्ण पत्ता | :- | मु.सोनखास, पो.पारवा, ता. घाटंजी, जि. यवतमाळ ४४५३०६ |
| भ्रमणध्वनी क्र. | :- | ९९२१८१४५५५/९०७५२३७९९९ |
| वय | :- | ३० वर्षे, |
| शिक्षण | :- | पदवीधर |
| मुख्य व्यवसाय | :- | शेती |
| कुटूंबातील तपशील | :- | आई, बाबा, भाऊ |
| जोडधंदा | :- | कुकुटपालन (बटेर पालन) |
| एकूण जमीन (कोरडवाहु, बागायती इ.) | :- | ३ एकर |
| पाण्याचा स्त्रोत | :- | विहीर सिंचन |
| पिक पद्धती | :- | खरीप, सोयाबीन, तुर, कापूस रब्बी, सुर्यफुल, भाजीपाला, झेंडू, मोहरी |
| शेती अवजारे | :- | नांगर, वखर, स्प्रे, |

घटक क्षेत्रास अनुसरून उल्लेखनिय कार्याबाबत संक्षिप्त माहिती :-

मी श्री. क्रिष्णा रामलु पेंडपवार पदवीधर असुन यापुर्वी मी माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात खाजगी कंपनीत नोकरीला होतो. परंतु माझेकडे ३ एकर बागायती शेती असुन सुद्धा माझे शेतीकडे लक्ष देणे होत नव्हते. आई-वडील पारंपारिक पद्धतीने शेती करीत होते, त्यामध्ये त्यांना खुप अडचणीचा सामना करावा लागला. जसे की, शेतमालाला भाव नसणे, कमी

उत्पादन, शेत मजुरांचा अभाव या सर्व समस्यांना कंटाळून मी आई वडीलांना मदत म्हणुन शेती व त्याच बरोबर जोडधंदा म्हणुन कुकुटपालन करण्याचा निर्णय घेतला.मी सर्वप्रथम यवतमाळ जिल्हामधील कृषि विज्ञान केंद, ला भेट दिली असता त्यामध्ये शास्त्रज्ञांनी मला शेती पुरक व्यवसायासाठी कुक्कुटपालन, शेळीपालन, दुग्ध व्यवसाय या विषयी मार्गदर्शन केले. तसेच शास्त्रज्ञांनी शेती पुरक व्यवसायाचे प्रशिक्षण सेवा उदा. कुक्कुटपालन, शेळीपालन, दुग्ध व्यवसाय या मध्ये सहभाग नोंदवून तांत्रीक मार्गदर्शन घ्यावे असे सूचविले. त्यानंतर नोव्हेंबर २०१८ मध्ये कृषी विज्ञान केंद्र यवतमाळ येथे कुक्कुटपालन या विषयावर प्रशिक्षणामध्ये सखोल मार्गदर्शन घेतले. यवतमाळ जिल्हयातील कुक्कुटपालन ऐवजी बटेर पालनास  बटेर ला बाजारपेठेत मागणी, दर, रोगराई कमी या सर्व बाबीमुळे बटेर पालन करण्याचा निश्चय करून वेळोवेळी कृविके च्या माध्यामातून बटेर पालन करण्यास निर्णय घेतला.

बटेर पालनाची सुरुवात मार्च २०१९ मध्ये (Japanees Quail) या प्रजातीची निवड केली. सुरुवातीला मी ५०० पक्षी पासून २५००० रु भांडवल गुंतवणूक करून सुरुवात केली. तसेच आधूनीक पध्दतीच्या कच्चा शेड २० x ४० करीता अंदाजीत ४०००० ते ५०००० रु गुंतवणूक करून शेड तयार केले त्यामध्ये  अंदाजे ५००० पक्षी संगोपन करू शकते.

त्यामध्ये मला एका आठवडयामध्ये २५०० रु खादयासाठी व मजुरी व ईतर खर्च आला.

वरील सर्व पक्षी ३७५०० ला विक्री करून मला १०००० रु शुध्द  नफा मिळाला.

आता मी दर महिन्याला साधारणत: ४,०००/- बटेर चे पिले बोलावुन माझ्या व्यवसायात वाढ केली. त्याचा खर्च ३६००० रु येतो. पक्षाचे खादय २० क्विंटल दाना रु ६०००० चा खर्च येतो मला आता एका पिलामागे १० रु. प्रमाणे नफा मिळतो. साधारणत: मला महिन्याखेरीज रु. २५,०००/- ते ३०,०००/- नफा मिळतो. यवतमाळ, चंद्रपुर, वर्धा, नांदेड या जिल्ह्यामध्ये विक्री करतो.

२. कार्यासपुष्टी देणारी छायाचित्रे/प्रमाणपत्रे इ.


पशुसंवर्धन खाते
कुक्कुट प्रकल्प वाघापूर
जिल्हा परिषद, यवतमाळ

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

कुक्कुट पालन प्रशिक्षण
प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की,

श्री/~~श्रीमती~~ क्रिष्णा रामलु पेंडयवार

रा. सोनखास ता. घाटंजी जि. यवतमाळ

दिनांक १४/०१/२०१९ ते २१/०१/२०१९ पर्यंत आयोजित केलेल्या कुक्कुट पालनाचे प्रशिक्षण उत्कृष्टरित्या पूर्ण केले.

पशुधन विकास अधिकारी
कुक्कुट प्रकल्प, वाघापूर
जिल्हा परिषद, यवतमाळ

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
जिल्हा परिषद,
यवतमाळ













